



# पक्ष्यांच्या गोष्टी

प्रा. मिलिंद वाटवे




# पक्ष्यांच्या गोष्टी

प्रा. मिलिंद वाटवे

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य दहा रुपये




प्रकाशक
मिलिंद परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
मोहन बिल्डींग, १६२/बी
जगन्नाथ शंकरशेठ रोड,
गिरगांव, मुंबई ४०० ००४



© मिलिंद वाटवे



चित्रकार - राजेश लवळेकर

प्रथमावृत्ती - डिसेंबर १९९५
पुनर्मुद्रण - ऑगस्ट ९७
डिसेंबर ९८, फेब्रु. ०१
जुलै ०३

मुद्रक
माधव भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव,
मुंबई ४०० ००४


# गाणारा दयाळ

एक मोठी बाग होती. त्यात खूप लहान-मोठी झाडं होती. त्यातल्या झाडांना गोड गोड फळं लागायची, मधानी भरलेली फुलं यायची. बागेत खूप रंगीबेरंगी पक्षी रहायचे. हिरवे हिरवे पोपट, पिवळाजर्द हळद्या, पिसारा फुलवून नाचणारा मोर, निळ्याशार पंखांचा खंड्या, लालचुटुक निखारा आणि इतर खूप. त्यात एक काळाकाळा छोटा पक्षीही रहायचा. काळ्या रंगामुळे सगळे पक्षी त्याला खूप चिडवायचे. इतर पक्ष्यांसारखं त्याला एखादं छानसंसं नावही नव्हतं. सगळे त्याला

काळूच म्हणायचे. 'ए काळुंद्र्या, आमच्याबरोबर मिरवू नकोस, जा झाडीत जाऊन लप. आम्हाला तुझा रंग आवडत नाही.' असं काहीबाही बोलायचे.

काळूला वाटू लागलं, 'आपण काही करून गोरं झालं पाहिजे. काय करावं बरं? कुणाकडून तरी पांढरा रंग घ्यायला हवा.'

काळूनं धबधब्याच्या पाण्याला विचारलं, "तुझा पांढरा रंग मला देशील का?" धबधब्याचं पाणी म्हणालं, "माझ्या पांढऱ्या रंगाचा तुला काय उपयोग? फेसाळत असेन तोवरच मी पांढरा. एका जागी थांबलो, की पांढरा रंग गडप!"

मग काळूनं पांढऱ्या फुलांना विचारलं, "तुमचा पांढरा रंग द्याल का मला?" फुलं म्हणाली, "आमचा रंग काय, ताजी टवटवीत आहोत तोवर पांढरा! सुकलो की तो पिवळा पडणार. असला रंग घेऊन तू काय करशील?"

काळूला वाटलं, आता काय करावं? कुणाकडे जावं? तो असाच नदीकाठी विचार करत बसला होता. तेवढ्यात् नदीवर आला एक धोबी. आपल्या खांद्यावरचं बोचकं त्याने सोडलं. त्यातून बाहेर आले सगळे मळके



कपडे. साबण लावून त्याने सगळे कपडे धुवायला सुरुवात केली. हळूहळू सगळे पांढरे शुभ्र झाले!

काळू भुर्रकन् उडून धोब्याकडे गेला, म्हणाला, "मलाही पांढरं व्हायचंय, मला साबण लावून धुशील?" धोबी मोठ्याने हसला, "अरे साबण लावून कधी गोरं होता येतं का? तू आपला रंगाऱ्याकडे जा. तो तुला पांढऱ्या रंगानं रंगवून देईल."




काळू गेला रंगाऱ्याकडे. "रंगारीदादा, रंगारीदादा, मला गोरं गोरं व्हायचंय. मला पांढऱ्या रंगानी रंगवाल का?" रंगारी म्हणाला, "माझे रंग कच्चे. पाऊस आला की धुवून जातील; मग तू परत काळा होशील!"

काळू खट्टू होऊन इकडे तिकडे उडत राहिला. उडता उडता लांबवर त्याला एक छोटंसं सुंदर घर दिसलं. ते होतं गवळ्याचं. जवळ जाऊन काळूनं खिडकीतून हळूच आत डोकावून पाहिलं. आत लहान-मोठ्या मडक्यांमध्ये दूध-दही ठेवलेलं होतं. 'आपण दुधात भिजून पांढरे होऊ का?' त्याच्या मनात आलं; पण दुधाची त्याला भीती वाटली. 'दुधात आपण बुडून गेलो तर? त्यापेक्षा दह्यात लोळावं, दही चांगलं घट्ट आहे. त्यात बुडण्याची भीती नाही!'

काळू टुणकन् उडी मारुन एका दह्याच्या भांड्यात जाऊन बसला; तोच त्याला हसण्याचा आवाज आला. काळू दचकून बाहेर आला, तर तिकडे होती एक परी. ती म्हणाली, "अरे वेड्या, दह्यात लोळून का कधी गोरं होता येतं! पण तू चांगला आहेस, म्हणून मी तुला गोरं करीन. पण तुझ्या जेवढ्या अंगाला दही लागलं आहे, तेवढंच अंग कायमचं पांढरंशुभ्र होईल!"

काळूनं स्वतःकडे पाहिलं. त्याचं पोट तेवढं पांढरं झालं होतं, डोकं आणि पाठ काळीच! काळू आणखीनच हिरमुसला झाला. 'परीनं सुद्धा आपल्याला पूर्ण गोरं केलं नाही.' परीनं काळूच्या मनातलं ओळखलं. ती काळूच्या जवळ गेली, त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, "अरे वेड्या, काळा असलास म्हणून काय झालं! त्यात काही कमीपणा नाही. तुझा आवाज तर किती गोड आहे. तू माझ्यासाठी एक गाणं म्हण बरं!"




काळू एका झाडाच्या फांदीवर बसून गाऊ लागला. गाता गाता आपला काळा रंग विसरून गेला. त्याचं गाणं ऐकून सगळे पक्षी आजूबाजूला गोळा झाले. आश्चर्य करू लागले, 'हा कोण नवा पक्षी? आणि याचं गाणं तर किती गोड!' नीट निरखून पाहिल्यावर पोपट म्हणाला, "अरे हा तर आपला काळू! पण तो आता काळू राहिला नाही. छान दिसू लागला आहे. आणि त्याचा आवाज तर किती गोड आहे!"

आजही हा पक्षी एखाद्या उंच फांदीवर बसून खूप खूप गातो. आता त्याला कुणी काळू म्हणून चिडवत नाही. दह्यात लोळला म्हणून त्याला दह्याळ म्हणतात.

तुम्ही पहाटे उठून बागेत गेलात, तर त्याचं गाणं तुम्हालाही ऐकू येईल, आणि गाणं ऐकता ऐकता तुम्हीही तुमची भांडणं, रुसणी, सगळं विसरून जाल!

***



# सुईचा जन्म



खूप वर्षं झाली या गोष्टीला. त्या वेळी माणूस गुहेत रहायचा. त्याला कपडे शिवायचेही माहीत नव्हते. थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी तो प्राण्यांची कातडी किंवा प्राण्यांच्या केसांपासून-लोकरीपासून बनविलेली घोंगडी नुसतीच अंगावर ओढून घ्यायचा.

एक दिवस मोठा वादळी पाऊस झाला. जोराचा वारा सुटला. अनेक झाडं पडली. माणूस तेव्हा फळं गोळा करायला जंगलात गेला होता. वादळ आलं म्हणून परत आला. कशीबशी घोंगडी ओढून कुडकुडत होता तो. आता आपल्या गुहेतल्या घरात शिरणार तेवढ्यात त्याला एक बारीक स्वरातलं विव्हळणं ऐकू आलं.

एक छोटसं झाड वाऱ्यानी पडलं होतं आणि एका फांदीखाली एक छोटासा पक्षी अडकला होता. माणसाने ते पाहिलं आणि त्याला हळूच सोडवलं. तो चिमुकला हिरवा पक्षी रक्ताळला होता. त्याचे पंख मोडले होते. पक्षी माणसाला म्हणाला, "वरच्या फांदीत माझं घरटं आहे रे. त्यातली तीन पिलं कशी आहेत कोण जाणे. माझे तर पंख मोडलेत."

माणूस म्हणाला, "थांब, मी बघतो."

पडलेल्या झाडाच्या फांद्यांमध्ये माणूस घरटं शोधू लागला. अवघड काम होतं ते. जोराचा वारा वाहतच होता. दोन्ही हातांनी फांद्या धरून तोल सावरत असताना त्याच्या अंगावरची घोंगडी उडून गेली. पण अखेरीस घरटं सापडलं. पिलं सुखरूप होती. घरटं आणि जखमी पक्ष्याला घेऊन माणूस गुहेत आला.

पक्षी माणसाला म्हणाला, "दोन्ही पंख मोडलेला मी काही आता जगणार नाही. पण माझ्या पिलांना वाचवून तू मोठे उपकार केले आहेस. ते करत असताना तुझी घोंगडी पण गेली. तू कुडकुडतो आहेस.

पण मरण्यापूर्वी मी तुला एक कला शिकवतो. माझं घरटं बघ कसं पानं शिवून तयार केलं आहे.



कापसाचे धागे केले आहेत. मग पानांच्या कडांना चोचीनं बारीक भोकं पाडली आहेत. त्यातून धागे ओवून घेतले आहेत. कापूस पिंजून त्याचं आतल्या बाजूनी अस्तर लावलंय. तू जर असंच करून कपडे शिवलेस तर ते अंगाबरोबर बसतील. वाऱ्यानी उडून जाणार नाहीत. हातानी सावरावे लागणार नाहीत. या जंगलात कापूस देणारी बरीच झाडं आहेत. ती तुला कापूस देतील." एवढं बोलताना पक्ष्याला धाप लागली.

माणसानी घरटं नीट पाहिलं. मग तो म्हणाला, "पण तुला जे जमतं ते मला कसं जमणार? मला कुठे तुझ्यासारखी चोच आहे?"


पक्षी म्हणाला, "मी माझी वरची चोच तुला देतो. त्याला मागच्या बाजूला बघ कसं बारीक भोक आहे ते. त्या भोकातून मी श्वास घेतो. तू त्या भोकातून धागा ओवून घे म्हणजे बघ कसं भरभर शिवता येईल ते."

पक्ष्यानी आपली चोच काढून दिली आणि माणसाच्या ओंजळीतच प्राण सोडले.


त्या शिंपी पक्ष्याच्या पिलांना माणसानं नीट वाढवून मोठं केलं आणि शिंप्यानी दिलेल्या चोचीचा उपयोग करून चांगले कपडे शिवण्याची कलाही

आत्मसात केली. दोघंही एकमेकांचे उपकार विसरले नाहीत. आजही शिंपी पक्षी माणसाच्या आश्रयानी घराभोवतालच्या बागेतच घरटी करतात. त्या घरट्यांना कुणी त्रास देत नाही.

माणसानी कपडे शिवण्याच्या कलेतही पुढे खूप प्रगती केली. आधी प्राण्यांची शिंगं तासून त्याच्या सुया बनवल्या. पुढे धातूचा शोध लागल्यावर तांब्याच्या आणि लोखंडाच्या सुया बनवल्या. पण सुईचा आकार तसाच राहिला. शिंपी पक्ष्याच्या चोचीसारखा टोकदार आणि मागे बारीक भोक असलेला.



# कोतवालाला घडली अद्दल




एका आमराईत खूप पक्षी राहत होते. होले, मैना, सुभग, हळदे, नाचरे, पोपट, सुगरण, वटवटे असे कितीतरी. झाडांच्या फांद्यांवर सगळ्यांची घरटी होती. पक्षी घरट्यात आपल्या पिलांना वाढवायचे, खाऊ पिऊ घालायचे. सगळे पक्षी सुखात होते. पण अधूनमधून शेजारच्या गावात राहणारा कावळा यायचा. तो घरट्यातली अंडी फोडायचा, पिल्लं पळवायचा, सगळ्यांना खूप त्रास द्यायचा. छोट्या पक्ष्यांचं त्या कावळ्यापुढे काही चालायचं नाही.

एक दिवस सगळ्या पक्ष्यांनी एक सभा भरवली. या कावळ्याला काय करावं बरं? कुणाला काही चांगला उपाय सुचेना. सगळे अगदी हताश झाले होते. तेवढ्यात कुठूनसा एक देखणा, राजबिंडा पक्षी उडत उडत येऊन सगळ्यांच्या मधेच उतरला. हा पाहुणा होता छोटासाच, पण दिसत होता खूप धीट. सगळ्यांच्या चेहऱ्यावर चिंता पाहून तो म्हणाला, "मित्रांनो, तुम्हाला कसली काळजी आहे? मी तुम्हाला मदत करू का?"

पक्ष्यांनी कावळ्याची हकिकत सांगितली. तो पक्षी म्हणाला, "एवढंच ना. तुम्ही मला तुमच्या आमराईत रहायला जागा द्या. मी करीन कावळ्याचा बंदोबस्त. एवढंच नाही, इतर कोणी शत्रू आले तर मी त्यांनाही पळवून लावीन. तुमचं मी सगळ्यांपासून रक्षण करीन."

सगळे पक्षी कबूल झाले. या नवीन पक्ष्याला त्यांनी घरट्यासाठी छानशी जागा शोधून दिली. हा पक्षीही होता मोठा शूर. कावळा आला, घार आली, मांजर आली तर तो एकदम अंगावर धावून जायचा, जोरजोरात त्यांना टोची मारायचा, आणि होता इतका चपळ की शत्रूच्या हातात कधीच सापडायचा नाही.





इतर सगळे पक्षी त्याच्यावर खूष झाले आणि त्याला 'कोतवाल साहेब' अशी हाक मारु लागले. त्याचा आदर करू लागले.

पण लवकरच या कोतवालाला गर्व झाला. आपल्यासारखा शूर कोणी नाही, असं त्याला वाटू लागलं. इतर पक्षी पडले गरीब. तो त्यांना त्रास देऊ लागला. कोणी एखादा मोठा किडा पकडला तर त्याच्यावर हल्ला करुन तो त्यांच्याकडून हिसकावून घ्यायचा.

पक्षी यालाही कंटाळले. आपापसात कुजबूज करू लागले. याला चांगली अद्दल घडवली पाहिजे.

एक दिवस पोपट कुठूनतरी घाबऱ्याघाबऱ्या आला. म्हणाला, "कोतवालसाहेब, कोतवालसाहेब, आपल्या पक्ष्यांच्या गावावर मोठ्ठं संकट येतंय." सगळे पक्षी चटकन गोळा झाले. कोतवाल ऐटीत म्हणाला, "मी असताना कसलं आलंय संकट? घार येऊ दे, नाहीतर गरूड येऊ दे. मी पळवून लावीन."

"घार, गरूड नाही; मधमाशा आणि भुंगे येताहेत. कोतवालसाहेब, आम्ही गरीब पक्षी इतर किडे पकडतो, पण मधमाशा आणि भुंगे पकडत नाही. तुम्ही मात्र शूर असल्यामुळे त्यांनाही एकटंदुकटं पकडून खाता. त्यामुळे ते चिडलेत. त्यांनी मोठ्या जमावानं आपल्यावर हल्ला करायचा ठरवलंय. मी त्यांचं बोलणं चोरून ऐकलं म्हणून मला कळलं."


"येऊ देत येऊ देत. मी नाही भीत त्यांना!" कोतवाल म्हणाला खरा, पण तो मनातून घाबरला होता. एखाद दुसरा भुंगा सहज मटकावून टाकता येतो, पण एकदम खूप भुंगे चावे घ्यायला मागे लागले तर काय करायचं!



पोपटानी कोतवालाला बोलण्यात गुंतवलं होतं, तेवढ्यात दोन सुगरण पक्ष्यांनी एक वेगळाच उद्योग चालवला होता. त्यांनी दोन छोटे कोळसे घेऊन कोतवालाच्या शेपटीच्या टोकाला दोऱ्यानी बांधून टाकले. कोतवालाला काही कळलं सुद्धा नाही.

इतक्यात 'बापरे आले!' असे म्हणत पोपट उडाला. बाकी पक्षी पण उडून गेले. सगळे उडाले म्हणून मनातून घाबरलेला कोतवालही उडाला. उडता उडता मागे वळून पाहतो तर काय, शेपटीच्या मागे ते दोन कोळसे दिसले. त्याला वाटलं भुंगेच आपल्याला चावायला येताहेत. तो जिवाच्या आकांतानी उडायला लागला. भुंग्यांना चुकवायला म्हणून झाडाच्या फांद्यांमधून वेडावाकडा उडायला गेला आणि मग झाली एक गंमत. ते दोऱ्यानी बांधलेले कोळसे फांद्यांत अडकले आणि शेपटीला बांधलेल्या दोऱ्यांमुळे कोतवाल उलटा लटकू लागला. धडपडू लागला. सुटण्यासाठी जास्ती जोर केला तर शेपटीच मधोमध फाटायला लागली.

ही फजिती बघायला सगळे पक्षी आजूबाजूला लपून बसले होतेच. ते फिदीफिदी हसू लागले. कोतवाल शरमेनी काळा ठिक्कर पडला. मला सोडवा म्हणत



गयावया करू लागला. पक्षी म्हणाले, "पहा, गरीब पक्ष्यांना त्रास देत होतास, तुला चांगली अद्दल घडली." मग कोतवालानी परत कधी कुणाला त्रास न देण्याचं आणि पूर्वीसारखंच सगळ्यांच्या घरट्यांचं रक्षण करण्याचं वचन दिलं. पक्ष्यांनी त्याची सुटका केली.

कोतवाल आपल्या वचनाला जागला. आजही पक्ष्यांची अंडी चोरु पाहणाऱ्या कावळ्यावर त्वेषानी हल्ला करणारा शूर कोतवाल आपल्याला दिसतो. कोतवालाच्या आसऱ्यानी इतर पक्षी घरटी करतात. क्वचित कधीतरी दुसऱ्या एखाद्या पक्ष्यानी पकडलेला किडा चोरण्याचा कोतवालाला मोह होतो, नाही असं नाही. पण आपला काळाठिक्कर पडलेला रंग आणी दुभागलेली शेपटी पाहून त्याला आपली फजिती आठवते; आणि तो शहण्यासारखा वागू लागतो.

* * *

# घरट्याला गणपतीची सोंड



एक होता चिमणा. इतर चिमण्यांपेक्षा मोठा देखणा होता तो. रहायचाही रुबाबात. पिवळी धम्मक टोपी घालायचा. सगळे त्याच्या देखणेपणाची स्तुती करायचे. त्याची चिमणी सुद्धा त्याच्यावर खूष होती.

पण ही चिमणा-चिमणीची जोडी फार दुःखी होती. त्यांना पिल्लं नव्हती. घरटं केलं आणि अंडी घातली की एक दुष्ट बोका येऊन ती खाऊन जायचा. चिमण्याच्या पिवळ्या टोपीमुळे बोक्याचं लक्ष त्याच्याच घरट्याकडे जायचं. चिमण्यांनी झाडावर घरटं केलं तर बोका झाडावर चढून आला. एकदा एका घराच्या खिडकीवर घरटं केलं तर तिथंही बोका उडी मारुन


चढलाच. असं दोन-तीनदा झाल्यावर चिमणीही वैतागली. म्हणाली, "तुम्हाला साधं आपल्या घरट्याचं रक्षणही करता येत नाही. फुकटची ऐट तुमची." चिमण्याशी भांडून चिमणी माहेरी निघून गेली.

चिमणा बिचारा खिन्न होऊन इकडे तिकडे भटकू लागला. भटकून भटकून दमला आणि एका झाडावर बसला. झाडाखालीच एक छोटंसं देऊळ होतं. चिमणा ते पहिल्यांदाच पहात होता. हे काय असेल बरं? त्याला प्रश्न पडला. तेवढ्यात त्याला तो दुष्ट बोका परत दिसला. 'अरे! हा आपला पाठलागच करतोय की काय?' पण बोक्याचं लक्ष दुसरीकडेच होतं. अगदी दबून दबून एकेक पाऊल टाकत तो पुढे सरकत होता. कुठे होतं त्याचं लक्ष? चिमण्याने पाहिलं, समोर एक उंदराचं पिल्लू मजेत खेळत होतं. अरे बापरे. बोका त्या पिल्लावरच उडी घेण्याच्या पवित्र्यात होता. चिमणा एकदम ओरडला. त्याच्या ओरडण्यामुळे उंदराच्या पिलाने दचकून एकदम उडीच मारली आणि ते पळत पळत देवळात शिरले. बोका वेगानी त्याच्यामागे धावला आणि तोही देवळात शिरला. चिमण्याने कुतूहलाने देवळात डोकावून पाहिलं.



देवळात एक गणपतीची मोठ्ठी मूर्ती होती. ते उंदराचं पिल्लू पळतपळत गणपतीच्या मांडीवर चढलं. तिथून पोटावर चढलं आणि पटकन गणपतीच्या सोंडेतच शिरलं. बोकाही मांडीवर चढला, पोटावर चढला. पण सोंडेत काही त्याला शिरता येईना. त्यानी सोंडेत पंजा घालण्याचा प्रयत्न केला पण तेही त्याला जमेना. चिमण्याला खुदकन हसू आलं. जिथे बोक्याची भीती नाही अशी एक तरी जागा होती तर.

पण काय उपयोग? त्या जागी तर उंदरांनी आधीच घर केलं होतं. तो आपलं घर थोडंच सोडणार




होता. काय करावं बरं? विचार करता करता चिमण्याला एक मस्तपैकी कल्पना सुचली. आपल्या घरट्यालाच आपण गणपतीच्या सोंडेसारखी एक सोंड लावून घेतली तर?

चिमणा ताबडतोब कामाला लागला. त्याने विचारपूर्वक झाडाची एक बारीक फांदी निवडली. गवताची एक एक काडी जमवून त्यांनी आधी आपलं घरटं नीट विणून काढलं. अंडी ठेवण्याची जागा तयार केली. मग एका बाजूनी त्याला खाली लोंबणारी एक लांब सोंड विणून काढली. आता घरट्यात शिरायचं तर त्या सोंडेतनंच शिरावं लागणार होतं. चिमण्याने एकदा आपलं घरटं डोळे भरुन पाहिलं. तो खूष झाला. मग त्याने चिमणीला माहेरुन बोलावून घेतलं. तिलाही घर आवडलं.

बाकीचे पक्षी बघतच राहिले. एवढं सुबक, सुंदर, नीटनेटकं घरटं त्यांनी कधीच पाहिलं नव्हतं. त्यांना वाटलं, 'हा चिमणा काहीतरी वेगळाच दिसतोय.' तेव्हापासून तो 'चिमणा' राहिला नाही. छानसं घर करणारा म्हणून त्याला सुगृहीन् किंवा सुगरण असं नाव पडलं.



गणपतीसारखी सोंड लावलेली सुगरणीची घरटी आपल्याला आजही दिसतात. पिवळीधमक टोपी घातलेला सुगरण पक्षीही दिसतो. मांजरी, बोके, मुंगसं, कावळे त्याच्या घरट्याकडे पाहून नुसतेच चरफडतात. कुणालाच त्या सोंडेतून आत शिरता येत नाही. सुगरण आणि त्याची बायको सुखानी आपल्या घरट्यात राहतात.



# पावशाची पिलं

फार पूर्वीची गोष्ट. तेव्हाही आजच्यासारखाच पाऊस पडायचा. पण पावसाळा येणार कधी, पाऊस पडणार कधी, थांबणार कधी; हे झाडांना, प्राण्यांना, पक्ष्यांना काही कळायचंच नाही. एक दिवस झाडं पक्ष्यांना म्हणाली - "तुम्ही एवढे उंच आभाळात उडता, तर जरा ढगांना विचारून तरी येत जा कधी येणार ते. आम्हांला काही कळतच नाही. नवी पानं केव्हा करायची, शेंगा कधी वाळत घालायच्या, बिया केव्हा उधळायच्या; हे सारं जरा आधी नको का कळायला?"

पक्षी म्हणाले, "तर तर! आम्हांला जसा काही दुसरा उद्योगच नाही. ढगांना विचारून यायचं म्हणजे पश्चिमेला केवढं लांब जाऊन यायला पाहिजे. तेच करत बसलो तर आमच्यासाठी अन्न कोण शोधणार, आमचं पोट कसं भरणार?"

झाडं म्हणाली, "सोपं आहे, तुमच्यासाठी आम्ही मोठी फळं तयार करू. बियांभोवती जास्ती गर ठेवू, तो तुम्ही खा."





"ते ठीक आहे, पण आमच्या पिलांचं रक्षण कोण करणार?"

"तेही आम्ही करू. आम्ही आमच्या पानांनी तुमची घरटी लपवून, झाकून ठेवू. ऊन लागणार नाही, पाऊस लागणार नाही, की कुणाची नजर पडणार नाही."

पक्षी म्हणाले, "एवढंच नाही काही; पिलांची नवी पिसं नीट विंचरावी लागतात, घरटं साफ करावं लागतं, पिलांना भरवावं लागतं, पंखांनी ऊब द्यावी लागते, गाणं गायलाही शिकवावं लागतं."

झाडं हिरमुसली. हे सगळं कसं करायचं त्यांना माहीत नव्हतं.

एक पक्षी हुशार होता. तो इतरांना म्हणाला,

"आपण असं करू या का? मी एकटा ढगांना विचारून यायला तयार आहे. पण माझी एक अट आहे. माझ्या पिलांची काळजी तुम्ही इतर पक्ष्यांनी घ्यायला पाहिजे." बाकीचे पक्षी राजी होईनात.

आंब्याच्या झाडाने त्या हुशार पक्ष्याला हळूच जवळ बोलावलं. ते म्हणालं, "तुझ्या पिलांची काळजी मी घेईन. तू खुशाल ढगांकडे जा."

त्या पक्ष्याने अचंब्यानी पाहिलं. "तू कसा माझ्या पिलांची काळजी घेणार? तुला कुठे चोच आहे? तुला कुठे पंख आहेत?"

आंबा म्हणाला, "चोच नाही, पंख नाहीत, पण एक युक्ती आहे. माझ्या अंगाखांद्यावर बऱ्याच पक्ष्यांची घरटी असतात. हे पक्षी बाहेर गेले असताना



मी हळूच तुला बोलावीन. तू त्यांच्या घरट्यात तुझी अंडी घाल. मी त्यांना ते कळूच देणार नाही. तुझं अंडं आपलंच म्हणून ते उबवतील. आपलंच पिल्लू म्हणून तुझ्या पिलांची काळजी घेतील."

"पटलं रे पटलं. छान युक्ती आहे. हा बघ मी चाललो ढगांकडे."

"अरे अरे, पण थांब, तुझं नाव तरी सांगून जा."

"तुला जे आवडेल ते म्हण."

"तू पावसाची वार्ता आणणार, तुला 'पावशा'च म्हणीन."


पावशा पश्चिमेच्या दिशेने उडून गेला. इतर पक्षी त्याला विसरूनही गेले. थोडे दिवस गेले, मग एके दिवशी सकाळी एक गाणं ऐकू यायला लागलं. एका उंच झाडावरून पावशा गात होता,

'पेऽर्ते व्हा, पेऽऽर्ते व्हा, पाऊस आला, पहिल्या पावसाचे ढग येताहेत हळूहळू.'

शेवरीचा कापूस भुरुभुरु उडून गेला. बहाव्याच्या शेंगा तडकल्या. पळसाच्या शेंगा गळून पडल्या. आंबा पिकून पिवळाधमक झाला. पावसाच्या स्वागताला

सगळ्या जंगलानी कोवळ्या पालवीच्या पताका फडकवल्या. आणि मग खरंच आला पाऊस. झाडं पानांनी भरली. घरटी पिलांनी भरली. आंबा आणि पावशा अधून मधून गालातल्या गालात का हसतात ते काही इतर पक्ष्यांना कळलं नाही.

अजूनही दरवर्षी पावशा पावसाळा आल्याची सूचना देतो आणि पावशाची पिलं इतर पक्ष्यांच्या घरट्यात वाढतात. इतर पक्षांना हे गुपित अजूनही माहीत नाही.



# टिटवीचं घर उन्हात

टिट् टिट् करत टिटवी आपल्या घरट्यात परत आली. चोचीतून आणलेले किडे तिने पिलांना भरवले. पिलं आता मोठी झाली होती. 'उद्यापासून पिलांना उडायला शिकवायला हरकत नाही. टिटवीला वाटलं, दोन तीन दिवसात या झाडावरचं घरटं सोडून जाता येईल.' टिटवीनी खूप समाधानाने मावळत्या सूर्याकडे पाहिलं.

खूप खूप वर्षांपूर्वी टिटवीही इतर पक्ष्यांसारखी झाडावर घरटं बांधत असे. ती दिवसभर पाण्याजवळचे किडे पकडायची आणि पिलांसाठी घरट्यात घेऊन यायची. संध्याकाळ झाली की पिलांबरोबर घरट्यात झोपायची.

त्या दिवशी संध्याकाळी काय झालं, वाटेनं जाणारे चार वाटसरू त्याच झाडाखाली मुक्कामाला आले. त्यांनी एक शेकोटी पेटवली आणि त्याच्याभोवती झोपले. सकाळ झाल्यावर निघून गेले.

झाड टिटवीला म्हणालं, "बघ कशी आहेत ही माणसं. निखारे तसेच सोडून गेली. वाऱ्यानी आग पसरली म्हणजे! टिटवे तू तुझ्या चोचीत थोडं पाणी घेऊन ये आणि निखारे विझव."

टिटवी म्हणाली, "माझं काम नाही ते!"

झाड म्हणालं, "अगं, आग लागली तर सगळं गवत, सगळी छोटी झुडपं, कोवळी रोपं जळून जातील. मला पाय असते तर मीच आणलं असतं पाणी."

टिटवी म्हणाली, "गवत जळालं तर जळू दे. माझं घरटं खूप उंचावर आहे. त्याला नाही काही व्हायचं आणि पिलंही मोठी झाली आहेत आता माझी. आग लागली तर आम्ही सगळे उडून जाऊ."

थोड्या वेळानी खरंच वारा सुटला. विझू लागलेले निखारे पुन्हा फुलले, ठिणग्या उडू लागल्या, वाळलेलं गवत पेटलं. आग पसरली. कितीतरी छोटी छोटी रोपं, झुडपं जळू लागली.

आता मात्र झाड रागावलं. टिटवीला म्हणालं, "तू वेळीच निखारे विझवले असतेस तर चार थेंब पाणी पुरलं असतं. तुझ्यामुळे ही सगळी झाडंझुडपं जळून गेली. तुला मी शाप देतो. यापुढे कोणतंही झाड तुला



आसरा देणार नाही. तुला झाडावर घरटं करता येणार नाही. उन्हानी तापलेल्या मातीत तुला उघड्यावर पिलं वाढवावी लागतील. एक गवताचं पातं सुद्धा तुला सावली देणार नाही."


आता मात्र टिटवी घाबरली. गयावया करू लागली. झाडाला म्हणाली, "मला एवढी मोठी शिक्षा करू नका. आजोबा, तुम्ही दयाळू आहात. पाणी घालणाऱ्याला आणि कुऱ्हाड चालवणाऱ्याला, दोघांनाही तुम्ही सारखीच सावली देता. माझी चूक झाली, पण मला क्षमा करा. उघड्यावर घरटं केलं तर कावळे, घारी, कोल्हे, कुत्री माझ्या पिलांना खाऊन टाकतील."

झाड म्हणालं, "ऊठ, माझा शाप खोटा होणार नाही; पण तुझ्या पिलांचं रक्षण होईल. तुझ्या अंड्यांवर



यापुढे असे ठिपके असतील की तुझ्या शत्रूंना ती वाळूच वाटेल. अंडी दिसणारच नाहीत. तुझ्या पिलांचाही रंग असा असेल की ती मातीच्या ढेकळासारखीच दिसतील. कुणाला ओळखूच येणार नाहीत. त्यामुळे उघड्यावर राहिली तरी त्यांचं रक्षण होईल.”

टिटवी मान खाली घालून आपल्या पिलांना घेऊन निघून गेली. तेव्हापासून टिटवी उन्हात उघड्यावर घरटं करते. दुपारी उन्हात अंडी खूप तापू लागतात तेव्हा टिटवी आपली पिसं भिजवून पाणी आणते आणि अंड्यांना गार करते. तेव्हा कधी कधी तिला वाटतं, ‘आपण असंच पाणी आणून ते निखारे विझवले असते तर?’



***